अधिसूचना

क्रमांक : १८५/२०२२ दिनांक : १०/११/२०२२

विषय :- नविन विषय/अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्नीकरणाबाबत..

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेल्या महाविद्यालयांकरीता, नविन विषय/अभ्यासक्रमांना शासन आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समिती अहवाल विद्या परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ कलम १२(७) अंतर्गत मा.कुलगुरुंनी स्विकृत केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांस, स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन विषय/अभ्यासक्रमास स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या कालावधीकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन **प्रथम संलग्नीकरण** प्रदान करण्यात येत आहे.

TABLE

Sr No.	Name of the college	New Courses / Subjects	Intake capacity	Period of affiliation	Govt. Sanction Letter No. & Date
1.	2.	3.	4.	5.	6.
1.	Smt. Narsamma Arts, Commerce & Science College,Kiran Nagar, Amravati (162)	M.A.-I (Economics) M.A.-I (Political Science)	40 40	For the Session 2022-23	क्र.एनजीसी२०२२/(११६/२२)/मशि-४, दि.८ ऑगस्ट, २०२२
2.	The College of Animation Bio-Engineering and Research Centre, Mardi Road, Amravati. (851)	M.Sc.-I (Animation)	20	For the Session 2022-23	क्र.एनजीसी२०२२/(११६/२२)/मशि-४, दि.८ ऑगस्ट, २०२२

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

अधिसुचना

क्रमांक : १८६/२०२२ दिनांक : १०/११/२०२२

विषय :- नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या....अधिसुचनेतील दुरस्तीबाबत.

सर्व सबंधितांचे माहितीकरीता अधिसुचित करण्यात येते की, संलग्निकरणाबाबत विद्यापीठ अधिसुचना क्र.१७७/२०२२, दि.२-११-२०२२ निर्गमित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये Gazette Part-II च्या पृष्ठ क्र.७४८ वरील अ.क्र.४ वरील यास्मीन सुलताना काजी सैय्यद आरिफउल्ला महिला महाविद्यालय, **दारव्हा,** ता. दारव्हा, जि. यवतमाळ या नविन महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक स्तंभ क्र.३ मध्ये (९१४) असा नमुद करण्यात आलेला आहे. त्याऐवजी ९१५ असा वाचण्यात यावा. तसेच Gazette Part-II च्या पृष्ठ क्र.७५० वरील अ.क्र.९ वरील वणी लायन्स वरिष्ठ महाविद्यालय, नांदेपेरा रोड **वणी,**ता. वणी, जि.यवतमाळ या नविन महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक स्तंभ क्र.३ मध्ये (९१५) असा नुमद करण्यात आलेला आहे. त्याऐवजी (९१६) असा वाचण्यात यावा. कृपया झालेल्या बदलाची नोंद घ्यावी.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****